

Council of Education's, Kolhapur

Deshbhakt Ratnappa Kumbhar College of Commerce

# DRK BULLETIN

(डीआरके वार्तापत्र)

info@drkcollegekolhapur.org
www.drkcollegekolhapur.org

• प्रेरणा : मा. सौ. रजनीताई मगदूम • मार्गदर्शक मा. श्री. प्रसाद कामत, ॲड. श्री. व्ही. एन. पाटील, डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. वैभव पेडणेकर

• संपादक : प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील • कार्यकारी संपादक : प्रा. श्री. बी. डी. इवंग • वर्ष दुसरे अंक ३ रा (एप्रिल २०२१)


## संपादकीय

'डीआरके वार्ता' म्हणजे विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या दृष्टीने महाविद्यालयाचे साक्षेपी प्रतिबिंब! डीआरके वार्ताचा तिसरा अंक आपल्या हाती देताना मला अत्यानंद होत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणक्षेत्र अक्षरशः ढवळून निघाले आहे. आज अनेक अडचणींचा डोंगर या क्षेत्रात निर्माण झाला आहे. अनेक नवीन संकल्पना उदयास आल्या आहेत. त्या स्वीकारणे व विद्यार्थी हित जोपासणे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. असे असले तरी आमचे महाविद्यालय नेहमीच विद्यार्थी केंद्रबिंदू मानून वाटचाल करणारे महाविद्यालय आहे.

'कोविड-१९'च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत. त्यासाठी इ.११वी पासून एम.कॉम. पर्यंतच्या सर्व वर्गांची ऑनलाईन अध्यापन प्रक्रिया तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सुरू आहे. अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारे उपक्रम ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात येत आहेत. तसेच विद्यार्थ्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होणेही आवश्यक असते. त्यासाठी महाविद्यालय तंत्रज्ञानाचा आधार घेऊन मूल्यमापनाची प्रक्रिया प्रभावीपणे राबवत आहे. एवढेच नव्हे तर या वर्षी इ.११वी ते बीबीए, एमबीए, एम.कॉम या सर्व वर्गांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात येत आहे. सर्व वर्गांचे ऑनलाईन प्रवेश देणारे हे शिवाजी विद्यापीठातील एकमेव महाविद्यालय आहे. यामुळे प्रवेशासाठी विद्यार्थी पालक यांची होणारी धावपळ बंद झाली. त्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्यातून समाधान व्यक्त होत आहे

'कोविड१९' मुळे मिळालेल्या वेळेचा पुरेपूर सदुपयोग महाविद्यालयाने करून घेतला आहे. या काळात महाविद्यालय आवारात सुरू असलेले नवीन बांधकाम पूर्णत्वाकडे चालले आहे. तसेच नॅक व ॲटोनॉमी साठी येणाऱ्या मूल्यांकन समित्यांचा विचार करून संपूर्ण महाविद्यालयाचे नूतनीकरण पूर्ण करण्यात आले.

महाविद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादन केलेले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. या सर्व कार्यामध्ये कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा मा. सौ. रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष मा. श्री. प्रसाद कामत, सचिव मा. ॲड. व्ही. एन. पाटील, संचालक मा. डॉ. विश्वनाथ मगदूम, मा. ॲड. वैभव पेडणेकर यांचे मौलिक मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या सर्वांचे तसेच महाविद्यालयातील सर्व कृतीशील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग या सर्वांचे आभार!

घरी रहा, सुरक्षित रहा. धन्यवाद!



मुख्य संपादक :
प्राचार्य, व्ही. ए. पाटील

## नवीन शैक्षणिक धोरणाबाबत तज्ञांच्या संमिश्र प्रतिक्रिया : रत्नाप्पा कुंभार जयंतीनिमित्त वेबिनार संपन्न

कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारण-समाजकारणातील महामेरू कौन्सिल ऑफ एज्युकेशन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त नवीन शैक्षणिक धोरण : 'भारतीय समाजासमोरील आव्हाने' या विषयावर वेबीनार संपन्न झाला. या वेबिनारमध्ये शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी या धोरणाची विश्लेषणात्मक मांडणी केली तसेच या धोरणासंदर्भात साधक-बाधक चर्चा केली

या वेबिनारचे उद्‌घाटन भारती विद्यापीठाचे कुलगुरू माणिकराव साळुंखे यांच्या बीज भाषणाने झाली. मार्गदर्शन करताना डॉ. साळुंखे म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरण भारतीय समाजव्यवस्थेला दिशा देणारे ठरेल. या धोरणामुळे नवीन कौशल्याधिष्ठित पिढी निर्माण होईल.'' या वेबिनार मधील दुसरे वक्ते व्ही. जे. पी. टी. मुंबईचे माजी अधिष्ठाता डॉ. संजय मंगला गोपाळ नवीन शैक्षणिक धोरणाचे विश्लेषण करताना म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरण म्हणजे शब्दांचा फुलोरा आहे.'' हे धोरण मांडताना ते राबवायचे कसे याबद्दल मात्र काहीही स्पष्टता या धोरणात सांगितलेली नाही. एकूण जी. डी. पी. च्या ६% खर्च शिक्षणावर होणे अपेक्षित असताना भारतामध्ये कधी एवढा खर्च करण्यात आला नाही ही शोकांतिका आहे. या धोरणामुळे शिक्षणाचे केंद्रीकरण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकजूट होऊन या नवीन धोरणाचा विरोध करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील प्रयोगशील शिक्षक ज्येष्ठ विचारवंत श्री. हेरंब कुलकर्णी म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरणामुळे बहुजन व वंचितांच्या शिक्षणाचा हक्क हिरावून घेण्याचा धोका निर्माण झाला आहे. सर्वांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा मुख्य मसुदा



वाचला पाहिजे, त्याचा अभ्यास केला पाहिजे. त्याचे जे संक्षिप्त तयार करण्यात आले आहे, त्यामध्ये अनेक महत्त्वाचे मुद्दे लपविण्याचा प्रयत्न केला आहे.'' संजय घोडावत विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरण राबवताना सध्या अस्तित्वात असणाऱ्या व्यवस्थेचे काय करावयाचे याचा कुठेही उल्लेख नाही. तसेच नवीन शैक्षणिक धोरण राबवण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा कशी उभी करणार याबद्दल प्रश्न आहे.'' या वेबिनार मध्ये सुटाचे कार्यवाह डॉ. सुधाकर मानकर यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमासाठी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा मा. सौ. रजनीताई मगदूम, सदस्य मा. डॉ. विश्वनाथ मगदूम ॲड. मा. वैभव पेडणेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव ॲड. व्ही. एन. पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुण शिंदे यांनी केले.

## देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांची पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात साजरी



कोल्हापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते, राजकारण, शिक्षण क्षेत्रातील महामेरू दे. भ. पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांची पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात महाविद्यालयात साजरी करण्यात आली. डॉ. रत्नाप्पाण्णाचे कार्य म्हणजे आजच्या राजकारणी व समाजकारणी लोकांना मार्गदर्शक आहे. राजकारण, समाजकारण व शिक्षण क्षेत्रात काम करत असताना अण्णांनी नेहमीच सर्वसामान्य बहुजनांचा विचार केला तो आजच्या काळातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणारा आहे. सहकाराच्या माध्यमातून आण्णांनी कामांचा डोंगर उभा केला, अनेकांचे संसार उभे केले. एवढेच नाहीतर अण्णा अनेकांना आधारवड वाटायचे. समाजप्रती असणारा त्यांचा कळवळा वाखाणण्या जोगा होता. अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या. त्यावेळी अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वप्रथम महाविद्यालयाच्या प्रांगणात अण्णांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. एन.सी.सी. विभागाच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रांगणात दे. रत्नाप्पाण्णा यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेणाऱ्या चरित्र फलकाचे व प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्ष मा. सौ. रजनीताई मगदूम, सचिव मा. ॲड. व्ही. एन. पाटील, सदस्य मा. डॉ. विश्वनाथ मगदूम, मा. ॲड. वैभव पेडणेकर, प्राचार्य व्ही. ए. पाटील, रजिस्ट्रार मा. श्री. अजित पाटील, प्राचार्य नारायणन् व प्र. प्राचार्य



डॉ. एस. जे. फराकटे, इत्यादी मान्यवर व सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, प्रशासकीय कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## युवकांना राज्यघटनेचा अन्वयार्थ लावता आला पाहिजे : प्रा. डॉ. प्रकाश पवार

'भारतीय राज्यघटनेने दिलेल्या स्वातंत्र्याची मूळ जाणीव नागरिकांना नाही. आपले संविधान प्रत्येक माणसावर विश्वास ठेवते आणि त्याचे अस्तित्व मान्य करते. राज्यघटना माणसाच्या इच्छेचा विचार करते. संविधान व्यक्तीला विवेकाने वागायला शिकवते. हेच संविधान समजून घ्यायला आपण कमी पडत आहोत, यामुळे न्यायी समाजाची बांधणी होत नाही. राज्यघटना फक्त अभ्यासक्रमापुरती मर्यादित राहिली आहे. ती प्रत्येक नागरिकापुढे खुली होणे गरजेचे आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

युवकांनी संविधानातून काय शिकले पाहिजे, या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी 'यंग इंस्पिरेटर्स नेटवर्क (यिन)' तर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेजमध्ये झालेल्या व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील अध्यक्षस्थानी होते. डॉ. एस. एस. कदम, डॉ. आर. एस. नाईक प्रमुख उपस्थित होते. डॉ. पवार म्हणाले, ''स्वतःचे प्रतिनिधीत्व निर्माण करण्याची संधी संविधानाने दिली आहे. मानवतावादाचे तत्त्व राज्यघटनेने दिले आहे. युवकांना राज्यघटनेचा अन्वयार्थ लावता आला पाहिजे. त्यासाठी त्यांनी संविधान वाचणे गरजेचे आहे. संविधानातून पुढे येणाऱ्या स्वातंत्र्य विचारांची जनजागृती 'सकाळ'च्या माध्यमातून 'यिन'सारख्या व्यासपीठावरून होत आहे, ही कौतुकाची बाब असल्याचेही ते म्हणाले.



देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेजमध्ये यिन तर्फे झालेल्या व्याख्यानात बोलताना प्राध्यापक डॉक्टर प्रकाश पवार

तसेच या व्याख्याना बद्दल विद्यार्थी संग्राम शिंत्रे, श्रद्धा फेफडे, साक्षी भांडवले, पराग हिर्डेकर, सुस्मिता धवन यांनी म नोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे आयोजन यिनचे समन्वयक अवधूत गायकवाड यांनी केले.

## प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील एक्सलन्स टीचर ऑफ द महाराष्ट्र पुरस्काराने सन्मानीत



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांचा गंगाधर वृत्तपत्रामार्फत दिला जाणारा 'एक्सलन्स टीचर ऑफ द महाराष्ट्र' हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

प्राचार्य व्ही. ए. पाटील यांनी प्रशासनामध्ये आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व कुशल प्रशासनामुळे महाविद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात उत्तुंग यश संपादन केले आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या विविध उपक्रमामध्ये महाविद्यालय अग्रेसर ठरले आहे. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या कार्यकाळात महाविद्यालयाचा शैक्षणिक व भौतिक विकास वेगाने होत आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. सर्टिफिकेट ऑफ एक्सलन्स व सन्माननिच्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व सतरातून अभिनंदन होत आहे.

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स आणि कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स आणि कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारच्या उद्घाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कौन्सिल ऑफ एजुकेशनच्या अध्यक्षा सौ. रजनीताई मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. व्ही. एन. पाटील, ॲड. वैभव पेडणेकर, श्री. नितीन दळवाई तसेच ऑलींपिक खेळाडू वीरधवल खाडे उपस्थित होते. दि. ५ जुलै २०२० रोजीच्या पहिल्या सत्रामध्ये डॉ. संदीप देवल यांनी सर्वांसाठी आरोग्य आणि शारीरिक तंदुरुस्ती आणि डॉ. गॉर्डना मार्कोविक– सर्बिया यांनी स्त्रियांचे आरोग्य आणि तंदुरुस्ती या विषयावर विस्तृत विवेचन केले. दि. ६ जुलै २०२० रोजीच्या पहिल्या सत्रामध्ये मि. युनिव्हर्स संग्राम चौगुले यांनी आहार व पोषण मूल्य आणि डॉ. ब्रान्को सिसिक – सर्बिया यांनी वैयक्तिक आणि सामुहिक आरोग्यासाठी ध्यानधारणा या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच वेबिनार मधील सहभागी व्यक्तींच्या प्रश्न आणि शंकांचे निरसन केले. सांगता समारंभ देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्र. संचालक शिवाजी विद्यापीठ– डॉ. पी.टी गायकवाड, कौन्सिल ऑफ एजुकेशनचे सदस्य डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. व्ही. एन. पाटील कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे उपाध्यक्ष श्री. नितीन दळवाई यांच्या संबोधनाने पार पडला. वेबिनार यशस्वी होण्यासाठी समन्वयक डॉ. शरद बनसोडे, डॉ.अशोक बन्ने, श्री. सुचय खोपडे, डॉ. के. जी. कांबळे, डॉ. एन. एच. जाधव, श्री. विनायक साळोखे, डॉ. अतुल जाधव, डॉ. टी. एस. झारी, डॉ. वर्षा रायनाडे, डॉ. सुष्मा चौगुले, सौ. टी. ए. हिलगे, श्री. प्रवीण साळवी इ. नी प्रयत्न केले.

## कॉमर्स कॉलेजच्या बास्केटबॉल मैदानाचे भूमिपूजन : आंतरराष्ट्रीय दर्जाचे कोर्ट होणार : साखरे

बास्केटबॉल मध्ये जिल्ह्यातील खेळाडूंनी राज्य राष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे. नव्या अत्याधुनिक क्रीडांगण यामुळे आंतरराष्ट्रीय स्पर्धात हे चमकदार कामगिरी करावी अशी अपेक्षा जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे यांनी व्यक्त केली. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या वतीने शहाजी लॉ कॉलेजच्या मैदानावर नवीन अत्याधुनिक बास्केटबॉल मैदानाच्या बुधवारी झालेल्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते.

डॉ. साखरे म्हणाले, कोल्हापूर जिल्हा क्रीडा क्षेत्रात राज्यात अग्रेसर आहे. त्यात बास्केटबॉलपटूनी ही राज्य, राष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे. आता नव्याने होऊ लागलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बास्केटबॉल मैदानामुळे स्थानिक खेळाडूंना अशा सुविधा मिळतील, याचा लाभ घेत आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करावी. याप्रसंगी माजी जिल्हा न्यायाधीश दिलीप मुरुमकर, नितीन दळवाई, कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा मा. सौ. रजनीताई मगदूम, सचिव ॲड व्ही. एन.



पाटील, प्रमुख उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. नारायण, डॉ. सुरेश फराकटे, आंतरराष्ट्रीय पंच डॉ. शरद बनसोडे, प्रा. प्रफुल मांगोरे–पाटील, अमित दलाल, शरद चव्हाण, उदय पाटील, धनराज पवार, इंद्रजीत कारखानीस, सलीम पठाण आदी उपस्थित होते.

## इंटरप्राएज वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन



नव लेखकांना व्यासपीठ मिळवून देणारे महाविद्यालयातील एक महत्त्वाचे माध्यम म्हणजे एंटरप्राइज वार्षिक नियतकालिक सन २०१९–२० च्या वार्षिक नियत कालिकाचा प्रकाशन समारंभ उत्साहात पार पडला.

या नियतकालिकांमध्ये नव लेखकांनी कथा, वैचारिक लेख, प्रवास वर्णन, व्यक्तिचित्र, माहितीपर लेख, कविता यांच्या माध्यमातून त्यांच्या भावना, मते मांडली आहेत. या नियतकालिकाच्या पानापानांवर नवलेखकांच्या सर्जनशीलतेचा आविष्कार पाहायला मिळतो. हा प्रकाशन सोहळा कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा मा. सौ. रजनीताई मगदूम यांच्या हस्ते पार पडला. यावेळी झालेल्या कार्यक्रमासाठी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव ॲड. मा. व्ही. एन. पाटील, सदस्य मा. डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड. मा. वैभव पेडणेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्राचार्य डॉ. नारायणन, प्र. प्राचार्य डॉ. फराकटे, रजिस्ट्रार, मा. श्री. अजित पाटील, संपादकीय मंडळ इत्यादी मान्यवर, सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

## कॉलेज ऑफ कॉमर्स बॅच १९८८ चे उल्लेखनीय कार्य

कॉलेज ऑफ कॉमर्स बॅच १९८८ तर्फे कोल्हापूर जिल्ह्यातील कोरोना संकटग्रस्त, सिने तंत्रज्ञ, कलाकार व कर्मचारी वर्ग यांना सोशल ॲक्टिविटी फंडातून जीवनावश्यक धान्य वस्तू वाटप कार्यक्रम कॉलेजच्या प्रांगणात दि. ९ ऑगस्ट, २०२० रोजी सकाळी ११ वाजता संस्थेचे सेक्रेटरी ॲड. श्री. व्ही. एन. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला. त्यावेळी सदर फंडाचे सक्रिय सभासद होते. यावेळी २०० कामगार, तंत्रज्ञ व कलाकार यांना धान्य किट वाटप केले. यावेळी कार्यक्रम टप्प्याटप्प्याने घेण्यात आला व कार्यक्रमाच्या ठिकाणी थर्मल चेक व सॅनिटायझर ची सोय केली होती. विद्यार्थी कॉलेज शिकतात व निघून जातात. परंतु मैत्री ही कायम राहते. कारण कॉमर्स कॉलेज चे १९८८ च्या बॅचने हे दाखवून दिले आहे. यांचे कार्य हे अत्यंत उल्लेखनीय आहे. या बॅचने सोशल ॲक्टिव्हिटीज द्वारे असे कार्य करणार असल्याचे व या ॲक्टिव्हिटीज मधील हा पहिला टप्पा असल्याचे अभिनेते महादेव साळुंखे यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.




यावेळी उपस्थित राजेश साबणे,संजय रोटे, विजय परमणे, विजय गायकवाड, आनंद शिंदे, जयप्रकाश वर्दन, शामल चौगुले, संजय माने, सुषमा ठाकूर, फिरोज बागवान, राजू अंकलीकर, नितीन कुलकर्णी अतुल साळोखे व नंदन कुलकर्णी उपस्थित होते. अभिनेते महादेव साळोखे यांनी सर्वांचे आभार मानले. या बॅचशी विशेष संपर्क व प्रयत्न महादेव साळोखे व सुषमा ठाकूर यांनी केले. स्व. डॉ. दिनकरराव साळोखे नर्सिंग ब्युरो तर्फे स्टाफला ओर्सनिक अल्बम ३० गोळ्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

## देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या चरित्रफलकाचे उद्घाटन



देशभक्त पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार म्हणजे महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणातील एक सुवर्णपान. स्वातंत्र्य चळवळीतील सक्रिय सहभागाने इंग्रजांना सळो की पळो करून सोडणाऱ्या अण्णांनी स्वातंत्र्यानंतर विकास कामांचा डोंगर उभा केला. विविध शैक्षणिक व सहकारी संस्थांची स्थापना करून अण्णांनी हजारो जनसामान्यांच्या हाताला काम देऊन त्यांच्या दारापर्यंत सरस्वती व लक्ष्मीचा प्रवाह नेला. राजकारण व समाजकारण म्हणजे कोणाची मक्तेदारी नसून ती सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी मिळालेली संधी असते हा मूलमंत्र अण्णांनी खोलवर रुजवला. हेच अण्णांचे चरित्र आजही मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे. सध्याच्या युवकांना तो नेहेमीच आदर्शवत असा आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेणाऱ्या फलकाचे अनावरण देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या प्रांगणात करण्यात आले. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा सौ. रजनीताई मगदूम यांच्या हस्ते या फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशन चे सचिव मा. ॲड. व्ही. एन. पाटील, सदस्य मा. डॉ. विश्वनाथ मगदूम, मा. ॲड. वैभव पेडणेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील. रजिस्टार श्री. अजित पाटील, प्राचार्य डॉ. नारायणन्, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे इत्यादी मान्यवर प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यार्थी वसतिगृहाच्या नूतनीकरणाचे उद्घाटन



कौन्सिल ऑफ एज्युकेशन कोल्हापूर व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, नेहमीच विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांचे हित जोपासण्यत अग्रेसर असते. सध्याच्या धावपळीच्या युगात विद्यार्थ्यांचे आरोग्य, त्यांना राहण्याची उत्तम सोय व्हावी यासाठी महाविद्यालयाच्या वसतीगृहाचे नूतनीकरण करण्यात आले. अत्यंत अद्ययावत सोयीसुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या नूतनीकरण इमारतीचे उद्घाटन कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा मा. सौ रजनीताई मगदूम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव ॲड. व्ही. एन. पाटील, सदस्य डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. वैभव पेडणेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १४६ वी जयंती महाविद्यालयात उत्स्फूर्तपणे साजरी



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १४६ वी जयंती महाविद्यालयात उत्स्फूर्तपणे सोशल डिस्टनसिंग पाळून साजरी केली. यावेळी डॉ. ए. एस. बन्ने यांनी शाहू महाराजांचे ''स्त्री उद्धारामध्ये योगदान'' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी चिमठाणा चेअरमन डॉ. शरद बनसोडे तसेच सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## कॉमर्समध्ये करिअरच्या अनेक संधी उपलब्ध : डॉक्टर झारी

सध्याचे युग हे व्यवसाय व व्यापारीकरणाचे आहे. ज्यांना आजच्या बाजारपेठेचे उत्तम ज्ञान आहे तो स्वतःचे करिअर उत्तम पद्धतीने घडवू शकतो. तसेच आज विविध कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. ज्याच्याकडे कौशल्ये आहेत, तो आपले करिअर एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाऊ शकतो. यासाठी सध्या कॉमर्स शाखेचे शिक्षण घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन डॉक्टर ताहीर झारी यांनी केले. ते कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

कॉमर्समुळे शेअर मार्केट, व्यवस्थापन, बँकींग, सीए, सीएस, यूपीएससी, अकाउंटंट, व्यवसाय, व्यापार यासारख्या अनेक क्षेत्रांच्या करीयरची कवाडे विद्यार्थ्यांसाठी



खुली होतात. त्यामुळे या शाखेकडे आज विद्यार्थ्यांचा कल वाढतो आहे. असे ते म्हणाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील व प्रा. आर. ए. पोर्लेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

## मनुष्यबळ विकासासाठी नैतिक मूल्यांचे महत्व असाधारण : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ठकार, डॉ. झारी यांच्या संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन



शिवाजी विद्यापीठात डॉ. एच. एम. ठकार व डॉ. ताहीर स. झारी लिखित संदर्भग्रंथाचे प्रकाशन करताना मा.कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, मा. प्र- कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, मा. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्येष्ठ विधिज्ञ व कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव मा. श्री. व्ही. एन. पाटील, अधिष्ठाता व वाणिज्य व व्यवस्थापन विभाग प्रमुख मा. डॉ. एस.एस. महाजन, यांच्यासमवेत लेखकद्वयी वा इतर मान्यवर.

मनुष्यबळ विकासाच्या क्षेत्रात नैतिक मूल्यांचा संकोच झाल्यास त्याचे दूरगामी दुष्परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण होते. म्हणून यासंदर्भात नीतिमूल्यांचे असाधारण महत्व आहे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या एमबीए युनिटचे डॉ. एच. एम. ठकार आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालयातील डॉ. ताहीर झारी यांनी लिहिलेल्या 'एथिकल परस्पेक्टिव्हज ऑफ ह्यूमन रिसोर्स मॅनेजमेंट' या पुस्तकाचे प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले देशातील लोकसंख्येकडे म नुष्यबळाची ताकद म्हणून पाहिले आणि त्यादृष्टीने या मनुष्यबळाचा विकास केला. तिचा योग्य तऱ्हेने विनियोग केला तर देशाचे चित्र पालटेल. उत्पादन आणि सेवा क्षेत्रांमध्ये या मनुष्यबळाचा उत्तम वापर करता येईल. या मनुष्यबळ विकास क्षेत्रात प्रामाणिकता, समर्पणवृत्ती आणि नैतिक मूल्यांच्या जोपासनेलाही तितकेच मोठे महत्त्व आहे. त्याचा संकोच झाल्यास मनुष्यबळावर त्याचा विपरीत परिणाम होतोच. पण, उद्योग व्यवसायावरही त्याचे दुष्परिणाम होऊ लागतात. याचा देशाच्या भवितव्याची थेट संबंध असल्याने असा संकोच होणे कोणालाच परवडणारे नाही. याची जाणीव करून देणारा उत्तम संदर्भग्रंथ डॉ. ठकार व डॉ. झारी यांनी निर्माण केला आहे. शोधप्रबंधाचे हे एक उत्तम ग्रंथरुप त्यांनी साकार केले आहे.

प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, हा संदर्भग्रंथ एमबीएच्या विद्यार्थ्यांसह उद्योग व्यवसायात कार्यरत प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहे. विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकांनी एकत्र येऊन अशा प्रकारचा उपक्रम हाती घेणे याला ही वेगळे महत्त्व आहे. भारत मनुष्यबळाच्या बाबतीत आघाडीवर आहे. याचा सकारात्मक लाभ आपण घ्यायला हवा असे सूचित करणारा हा ग्रंथ आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव व जेष्ठ विधिज्ञ पी. एन. पाटील, गणित अधिविभाग प्रमुख डॉ. सरिता ठकार, डॉ. केदार मारुलकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. अनुप मुळे आदी उपस्थित होते. डॉ. एच. एम. ठकार यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला. डॉ. झारी यांनी आभार मानले.

## अंकुर मतिमंद पुनर्वसन शाळेस डीआरके कॉमर्स कॉलेज १९९२ बॅच कडून एक मदतीचा हात - सर्वत्र कौतुकाचा वर्षाव

न्यू इंडिया एज्युकेशन सोसायटी शाहूनगर, परिते संचालित 'अंकुर मतिमंद मुलांची शाळा आणि पुनर्वसन' या धर्मादाय संस्थेला देणगी वितरणाच्या निमित्ताने आज दुपारी १.३० वाजता ॲडमिन सह हेमंत प्रभावळकर, श्रीधर जोशी आणि सुजय पंगु जागेवर पोहोचले.

पाठोपाठ महिला ॲडमिन सुरेखा पाटील आणि शीतल पोतदार २.३० पर्यंत पोहोचले. प्रत्यक्ष देणगी वितरण समारंभ ३.०० वाजता सुरू झाला. संस्था संचालक विजय सर, कार्यवाह हेमंत कुलकर्णी, शिक्षक, प्रशिक्षक वर्ग आणि बाकी कर्मचारी वर्ग यांनी सर्वांचे अगत्याने स्वागत केले. पण कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष विद्यार्थीवर्ग खूपच कमी संख्येने उपस्थित होता.

सुरुवातीला विजय सरांनी सर्वांचे औपचारिक स्वागत पुष्प देऊन केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी संस्थेची निर्मिती, वाटचाल, विकास आणि भविष्यकालीन योजना यांचा आढावा घेतला आणि अशा प्रकारे एखाद्या व्हाट्सअप ग्रुप कडून रुपये पंचवीस हजारांची रोख स्वरुपात देणगी मिळवण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे हे आवर्जून नोंदवले. स्वागत सत्काराला उत्तरादाखल केलेल्या भाषणात ॲडमिनने आपल्या डी.आर.के. बी.कॉम. १९९२ या ग्रुप विषयी इत्यंभूत माहिती देत आपण आपल्या कार्याने प्रभावित झाल्याने अशा प्रकारे संस्थेला समक्ष भेट देऊन रुपये निधी प्रदान करण्याचा निर्णय घेतला असे सांगितले.



महिला ॲडमिन सुरेखा जी यांनी आपल्या आभार प्रदर्शनाचा छोटेखानी भाषणात आम्ही आमच्या ग्रुपच्या माध्यमातून अशा प्रकारे देणगी देण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ तुमच्या संस्थेत पासूनच होत आहे असे सांगितले. तर या दानवर्धक निधीचे प्रवर्तक स्वप्निल खेडकर आणि निधी संकलक हेमंत प्रभावळकर यांचे विषयी विशेष गौरवोद्गार काढले. संस्थेच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शेवटी आपल्या अगत्यपुर्ण स्वागत आणि आदरातिथ्याकरता संस्था संचालक आणि कर्मचारी आभार प्रदर्शन केले. आजच्या कार्यक्रमात इचलकरंजी येथील अपंग गायिका कु. लता नगरकर यांना दान करणे करता आणलेली स्वप्निल खेडेकर प्रायोजित सायकल खुर्ची (Wheel Chair) त्या उपस्थित न राहिल्याने संस्थेकडे सुपूर्द करून त्या आल्यावर त्यांना सन्मानपूर्वक वितरण करावे अशी विनंती केली.

## दे. भ. रत्नाप्पाण्णाच्या जयंतीनिमित्त ऑनलाईन वकृत्व स्पर्धेचे आयोजन

कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांच्या १११ व्या जयंती निमित्त दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या कनिष्ठ विभागाच्यावतीने ऑनलाइन वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेम ध्ये कु. सोनू चंद्रकांत गोरलने प्रथम क्रमांक मिळविला. तसेच कु. मेघाली सदाशिव जाधव व कु. सृष्टी विटेकर यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला. तर कु. आकांक्षा प्रदीप शेंडूरे व कु. दिव्या सुनील थोरात यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला.

यास्पर्धेचे संयोजन प्रा. बी. डी. डवंग यांनी केले. तर या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. सौ. एच. एस. पाटील व प्रा. सौ. एस. एम. चौगुले यांनी काम पाहिले. स्पर्धा आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, पर्यवेक्षक प्रा. आर. ए. पोर्लेकर यांचे मार्गदर्शन मिळाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

## पन्हाळगडावर स्वच्छता मोहीम



देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित पन्हाळगड स्वच्छता मोहिमेत सहभागी स्वयंसेवक

देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स मधील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे शिवजयंती निमित्त पन्हाळगड स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. प्लास्टिक बाटल्या, घनकचरा गोळा केला.मोहिमेची सुरुवात नगरपरिषद शूरवीर बाजीप्रभू देशपांडे पुतळा परिसरात झाली. तीन दरवाजा, अंबरखाना, नेहरू उद्यान, सज्जा कोटी येथे स्वच्छता करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा मा. सौ. रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष मा. प्रसाद कामत, सचिव ॲड. व्ही. एन. पाटील, सदस्य डॉ. विश्वनाथ मगदूम, ॲड. वैभव पेडणेकर यांचे सहकार्य मिळाले. प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम झाली. कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एफ. बोथीकर यांनी नियोजन केले. पराग हिरळीकर, चिंतामणी कुरणे, ऋषिकेश पाटील, महेश पाटील, अजय नाईक, मृणाली कालेकर, स्नेहल कांबळे, अपूर्वा पाटील यांनी संयोजन केले.

## केळी विक्रेत्याच्या मुलाचे सीए परीक्षेत यश



वडिलांचा हात गाडीवर केळी विक्रीचा व्यवसाय... स्पर्धेच्या युगात अंधकारमय भविष्य... ऐन परीक्षेत झालेला डेंग्यू अशा संकटांवर मात करीत अवधूत चंद्रकांत आवटे याने सी.ए. परीक्षेत यश संपादन केले आहे. आर्थिक परिस्थितीवर मात करीत त्यांनी संपादन केलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

आवटे कुटुंब आयरेकर गल्ली येथे वास्तव्यास आहे. चंद्रकांत आवटे हे ताराबाई रोड येथे हात गाडीवरून केळी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांनी मुलगा अवधूत याला सी.ए. करण्याचा निर्धार केला. अवधूत यांचे माध्यमिक शिक्षण एस. एम. लोहिया हायस्कूल मध्ये झाले. बी.कॉम.ची पदवी देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेजमध्ये घेतले. यावेळी त्याने महाविद्यालयात पहिला तर विद्यापीठात दहावा क्रमांक मिळवला, तर तो कॉलेजमध्ये पहिला आणि विद्यापीठात दुसरा आला. इयत्ता १२ वी पासूनच तो सी.ए. परीक्षेची तयारी करत होता. त्यामध्ये त्याला भाऊ बसवराजने नेहमी प्रोत्साहित केले. तर आई अन्नपूर्णा यांनी पाठबळ दिले. मोठ्या कष्टातून मुलगा सी.ए. झाला हे समजताच त्यांना आनंद अश्रू आवरले नाहीत.

**परिस्थितीनेच दिली प्रेरणा - अवधूत आवटे**

सातत्यपूर्ण कष्टाने यश मिळतेच परिस्थितीची जाणीव पदोपदी होती हीच परिस्थिती नेहमी प्रेरणा देत गेली पुढील काळातही कष्टातून प्रगती करावयाची आहे.

## कु. सोनू चंद्रकांत गोरलचे विविध स्पर्धांमध्ये देदिप्यमान यश



कु. सोनू चंद्रकांत गोरल इ. १२ वीच्या विद्यार्थिनीने सन २०२०-२१ च्या शैक्षणिक वर्षात विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. त्याबद्दल विविध क्षेत्रांतील कौतुक होत आहे. तिने ध्यास कलेचा ग्रुप, सिंधुदुर्ग जिल्हा आयोजित करोना विषाणू बाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय ऑनलाईन पोस्टर मेकिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला, तसेच शिव स्वराज्य युवा फाउंडेशन हुपरी यांच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय ऑनलाइन निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, कोल्हापूर जिल्हा आयोजित जिल्हास्तरीय ऑनलाईन खुल्या निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक, कोल्हापूर महानगरपालिके मार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पोस्टर मेकिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. ए. पोर्लेकर, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन मिळाले.

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कॉमर्स कॉलेजचे घवघवीत यश



फेब्रुवारी – मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून उत्कृष्ट निकालाची महाविद्यालयाची परंपरा कायम राखली. या परीक्षेच्या महाविद्यालयाचा निकाल ९८.३४% इतका उच्चांकी लागला. या परीक्षांमध्ये १२ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण संपादन केले.१३४ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले तर २८४ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले.

या परिक्षेमध्ये कु. परुळेकर जान्हवी समीर हिने ९४.३१% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. तर मोळे समीक्षा शरद ९२.७७%, कु. काटकर सुश्मिता सूर्यकांत ९२.७७% व कु. सन्मय संदेश कदम ९२.६२% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सदस्य मा. डॉ. वैभव पेडणेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. आर. ए. पोर्लेकर, सर्व प्राध्यापक वृंद यांचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन प्रा. बी. डी. डवंग, प्रा. सौ. पी. आर. नार्वेकर यांनी केले.

## प्रा. डॉ. टी. एस. झारी विविध पुरस्कारांनी सन्मानित



महाविद्यालयातील एमबीए विभागाकडील प्राध्यापक डॉक्टर झारी यांचा विविध पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.त्यांना अविष्कार सामाजिक व शैक्षणिक फाउंडेशन यांच्याकडून देण्यात येणारा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देण्यात आला .युवा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्याकडून दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श गुणवंत शिक्षक पुरस्कार, वृत्तपत्र गंगाधर यांच्याकडून आदर्श शिक्षक पुरस्कार व प्रतिष्ठित आय जे एम टी एस टी रिसर्च एक्सलन्स यांचेकडून देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट युवा संशोधक पुरस्कार देण्यात आला. त्यांना कौन्सिल ऑफ एज्युकेशन चे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

## ग्रंथालयात कॉम्पॅक्ट व्यवस्थेचे उदघाटन



महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध असून ग्रंथालयातील एकूण वाढती ग्रंथ संख्या पाहून ग्रंथालयामध्ये कॉम्पॅक्टची व्यवस्था करण्यात आली. सदर कॉम्पॅक्ट मध्ये ४२ कपाटातील पुस्तके ठेवण्याची व्यवस्था असल्याने जागेची बचत होण्यास मदत झाली आहे. परिणामी ग्रंथालयांमध्ये कॉम्पॅक्टमुळे उपलब्ध झालेली जागा ग्रंथालयाच्या इतर कार्याकरीता वापरने शक्य झाले आहे .सदर कॉम्पॅक्ट चे उद्घाटन कौन्सिल ऑफ एज्युकेशन चे सचिव एडवोकेट व्ही. एन. पाटील यांच्या हस्ते झाले यावेळी अध्यक्ष माननीय सौ रजनीताई मगदूम, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील व मान्यवर तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## जानेवारी २०२१ मध्ये झालेल्या सीए परीक्षेत कॉमर्स कॉलेजचे घवघवीत यश

दे .भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स हे पश्चिम महाराष्ट्रातील वाणिज्य शाखेचे शिक्षण देणारे महत्त्वाचे म हाविद्यालय आहे . या महाविद्यालयाला गुणवत्तेची उज्वल परंपरा आहे .या महाविद्यालयात शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी सी.ए या अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या परीक्षेत उज्वल यश संपादन करतात. यावर्षीही ही परंपरा कायम राहिली महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या कुमारी सानिका संजय अलवानी, चैतन्य दिलीप कुलकर्णी, अक्षय शहा, निवास मधुकर संकपाळ, कुमारी श्वेता किरण पवार ,कुमारी प्रतीक्षा बाजीराव पाटील या सहा विद्यार्थ्यांनी परीक्षेत उज्वल यश संपादन केले या यशस्वी विद्यार्थ्यांना कौन्सिल ऑफ एज्युकेशन च्या अध्यक्षा सौ रजनीताई मगदूम सचिव ॲड व्ही.एन पाटील संचालक डॉ. विश्वनाथ मगदूम ॲड वैभव पेडणेकर प्राचार्य डॉ व्ही .ए पाटील प्राध्यापक बी.टी नाईक व इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळाले.



**प्रा. पी. एम. मांगोरे-पाटील** यांनी ॲथलेटिक्स् फेडरेशन ऑफ इंडिया मार्फत घेण्यात आलेल्या प्रि लेवल- १ कोचिंग कोर्स व फेडरेशन स्टेट टेक्निकल ऑफिशएल (FSTO) पंच या दोन्ही परीक्षांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला.

**हार्दिक अभिनंदन**

## शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश

कोल्हापुर : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये (२०१९-२०) दे. श. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती पटकावित यश संपादन केले. आशिष ठकार, अर्चना कुलकर्णी, अभिषेक सुतार, अमृता जाधव, स्नेहल घोरपडे, प्राजक्ता घाडगे, करण हणबर, अक्षय पाटील, (बी.कॉम भाग १), साबा मणेर, रमन कामत, साक्षी माने (बी.कॉम भाग २) अमृता चौगुले (एम.कॉम.भाग २) स्नेहल तेली (बीबीए. भाग २), हर्षदा पाटील (बीबीए. भाग-३), ऋतुजा कुलकर्णी (एम. बीए. भाग २) यांचा समावेश आहे. गुणवत्ता प्राप्त १५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती धनादेश प्रदान करण्यात आले. संस्था व महाविद्यालयाकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## सोनू चंद्रकांत गोरल हिचे पोष्टर प्रदर्शन स्पर्धेत यश

कोल्हापूर महानगरपालिके मार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत घेण्यात आलेल्या पोष्टर प्रदर्शन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाची इ.१२ वी ची विद्यार्थिनी कु.सोनू चंद्रकांत गोरल हिने द्वितीय क्रमांक पटकावला. महाविद्यालयाच्या वतीने तिचे हार्दिक अभिनंदन.

## शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत कॉमर्स कॉलेज प्रथम

कोल्हापुर : शिवाजी विद्यापीठामार्फत दिल्या जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सने शहरी गटात वाणिज्य विद्या शाखेतून प्रथम क्रमांक मिळवला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. दरवर्षी महाविद्यालय प्राविण्य मिळवेल असा विश्वास प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी व्यक्त केला.

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत यशवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन




## यशाचे मानकरी



**कु. ऋतुजा कुलकर्णी**
एमबीए विभागात शिवाजी विद्यापीठात दुसरा क्रमांक



**कु. प्रीती कारंडे**
एमबीए विभागात शिवाजी विद्यापीठात सहावा क्रमांक



**कु. अखिल हळदे**
बीबीए विभागात ८२. ७६% गुण मिळवून शिवाजी विद्यापीठात दहावा क्रमांक



**कु. हर्षदा पाटील**
बीबीए विभागात ८३.३७% गुण मिळवून शिवाजी विद्यापीठात तिसरा क्रमांक

**हार्दिक अभिनंदन!**



डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, जिमखाना चेअरमन डॉ. बनसोडे व प्राध्यापक

* डीआरके वार्ता या वार्तापत्राचे प्रकाशन दे. भ. रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर येथून करण्यात आले. * या वार्तापत्रातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. * फक्त खाजगी वितरणासाठी. * मुद्रक : सप्तक प्रिंटिंग सर्व्हिसेस, कोल्हापूर.